I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 277-283
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# मराठी साहित्यावर गांधीवादाचा प्रभाव

बादलशाहा डोमाजी चव्हाण
मराठी विभाग, महात्मा जोतिबा फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जि. चंद्रपूर
*Corresponding Author: badalchawhan@gmail.com

| Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023<br>Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023 |
| --- | --- | --- |

**सारांश :-**

साहित्य ही एक ललित कलाकृती आहे. ती सामाजिकतेच्या अधिक जवळची आहे. त्यामुळे व्यक्तिच्या तत्त्वज्ञानाचा आणि विचारांचा प्रभाव समाजावर पडतांना दिसतो. १६ वे शतक हे आधुनिक मराठी वाङ्.मयाच्या प्रारंभीचे शतक होय. याच शतकात प्रामुख्याने मार्क्सवाद, आबेडकरवाद आणि गांधीवाचा प्रभाव मराठी साहित्यावर दिसू लागला. १६२० नंतर गांधीवादी मराठी वाङ्मयाचा प्रवाह उदयास आला. समकालीन वास्तवाने मानवी समाज-संस्कृती समोर निर्माण झालेले प्रश्न-समस्या सोडविण्यासाठी महात्मा गांधीचे विचार एक चांगला पर्याय आहे. महात्मा गांधीच्या शिकवणूकीतून लढण्याचे नैतिक बळ मिळते. त्यांनी उपोषण, सत्याग्रह, सविनय कायदेभंग ईत्यादींचा वापर करुन देशातील जनतेचा उध्दार केला. त्याचे पडसाद मराठी साहित्यातही पडणे स्वाभाविकच होते. स्वांतत्र्यलढयाच्या काळात महात्मा गांधीनी वेगवेगळया विषयांवर आपले विचार मांडले त्यांच्यानंतर त्यांचा हा वारसा त्यांचे अनुयायी विनोबा भावे आणि जयप्रकाश नारायण यांनी चालविला. या त्यांच्या विचारांना ढोबळमानाने 'गांधीवाद' असे म्हंटले जाते. अहिंसा, अपरिग्रह, श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन या तत्वावर विश्वास ठेवणारी राजकीय विचारप्रणाली म्हणजे 'गांधीवाद' होय. महात्मा गांधीनी स्वतः आपल्या 'हरिजन' व 'यंगइंडिया' या साप्ताहिकातून प्रबोधनपर विपूल लेखन केले. त्यांनी 'माझे सत्याने प्रयोग' ही आत्मकथा लिहिली. या सर्व लिखानातून त्यांची वैचारिक भूमिका स्पष्ट होते.

महात्मा गांधीचे विचार व आचार म्हणजे 'गांधीवाद' होय. एका पदयात्रीला संदेश देतांना गांधी म्हणतात की, 'माझे जीवन हाच माझा संदेश' हा गांधीवादाच्या बाबतीतही तितकाच सत्य आहे. गांधीजीच्या विचारांना आचाराचा आधार होता. त्यामुळे त्यांची थोंरवी गाणारे व स्वातंत्र्य आंदालनाचे महत्व सांगणारे अनेक लेखक, कवी उदयास आले. कवी भा. रा. तांबे. माधव ज्युलियन, विठ्ठलराव घाटे, कवी यशवंत, प्रा. भ. श्री. पंडित, कवी कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर, या कवींवर तर दादा धर्माधिकारी आयार्य जावडेकर, प्रभाकर दिवाण, आचार्य विनोबा भावे, वि. स. खांडेकर, वा. म. जोशी; साने गुरुजी, प्रेसा कंटक अशा अनेक लेखकांच्या साहित्यावर गांधीवादाचा प्रभाव कमी-अधिक प्रमाणात पडलेला दिसून येतो.

**बीजसंज्ञा :-** गांधीवाद, शिकवण, तत्वज्ञान, स्वातंत्र्य आंदोलन, साहित्य.

## प्रस्तावना :

साहित्य हे मनुष्याच्या जीवन-व्यवहाराचाच एक भाग आहे. साहित्याचा मानवी जाणिवा, तत्वे, मूल्ये, विचार यांच्याशी जवळचा संबंध आहे. लेखकाच्या साहित्यकृतीवर त्याच्या प्रकृतीनूसार कोणत्या ना कोणत्या विचारप्रणालीचा परिणाम होत असतो.

महात्मा गांधी हे जागतिक कीर्तीचे राजकीय पुढारी होते. त्यांच्या भारतीय राजकारणातील सहभाग महत्वाचा होता. असे असले तरी आजच्या राजकीय नेत्यासारखे ते स्वार्थी नव्हते तर सत्याचे उपासक होते. त्यामुळे त्यांनी आपल्या आत्मचरित्याला 'माझे सत्याचे प्रयोग' हे शीर्षक दिले. त्यांनी

मानवी श्रमाला अतिशय महत्वाचे स्थान दिले. स्वनिष्ठा, स्वशुध्दी, स्वशोध आणि स्वराज्य या मूल्यांवर भर दिला. त्यांची ही तत्वे समाजोपयोगी आहेत.

गांधी ही भारतची खरी ओळख आहे. गांधी हा विचार आहे, ती नैतिक जबाबदारी आहे. माणुसकीचा विश्वास आहे. ''मोहनदास करमचंद गांधी हा माणूस समजून घ्यायचा असेल तर, तुम्हाला आधी स्वत: 'माणूस' होणं गरजेच आहे. गांधी समजून घेण्याची प्रक्रिया ही माणूस होण्याच्या प्रक्रियेपेक्षा वेगळी नाही. या प्रक्रियेत तुम्हाला अंर्तबाहय उघड व्हाव लागतं. आपल्या जगण्याचा तटस्थपणे विचार करावा लागतो हे सोप नसंत. म्हणून गांधी लोकांना सोपा वाटत नाही.''[१] हे अगदी सत्य आहे. माणूस बनल्याशिवाय गांधीजींच्या विचारांना समजणे अशक्य आहे. महात्मा गांधी सहा वर्ष सेवाग्राम आणि तीन वर्ष येरवडा (पुणे) येथे राहिले. म्हणजेच महाराष्ट्रात त्यांचे एकूण नऊ वर्षे वास्तव्य होते. त्यामुळे मराठी साहित्यात गांधीवाद मूळ धरु लागला.

**वाद म्हणजे काय?**

मनुष्य हा त्याच्या सुरुवातीच्या काळापासूनच ज्ञान मिळवित आला आहे. आवश्यकतेनुसार तो आपले कार्य करीत असतो. त्या कार्यामुळे काही फायदा तर काही नुकसानही होत असते. मात्र तो आपली कृती करणे थांबवित नाही. जाणिवेव्दारे तो जाणतो, ते कार्य करीत असतो. त्याच्या मनामध्ये जे विचार येतात त्याचा अनुभव तो घेत असतो. ते बरे-वाईट अनुभव तो विसरत नाही तर साठवून ठेवतो. त्या अनुभवामूळेच तो ज्ञानी बनत जातो.

तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोणातून जीवनाकडे पाहण्याची भूमिका म्हणजे वाद होय. साहित्याचा वादाशी / तत्त्वप्राणालीशी अगदी जवळचा संबंध आहे. ''व्यक्तिमत्त्वाच्या या जडणघडणीनूसार आणि युगतत्वाशी भिडण्याच्या तत्वज्ञाच्या कुवतीनुसार तत्त्वज्ञानात वेगवेगळे दृष्टिकोन साकार होतात. या प्रणालींना वाद म्हटले जाते.''[२] विचारवंताच्या व्यक्तिमत्त्वासारखेच त्याचे तत्वज्ञान असते. या त्याच्या विचारांना वेगवेगळी व्यक्तिमत्व असतात. सभोवताली निर्माण झालेल्या प्रश्नांना छेद देण्याची पध्दत, उत्तरे शोधण्याची पध्दत निरनिराळी असते. म्हणूनच विशिष्ट दिशेन प्रवाहीत होत असलेल्या विचारवंतांना स्वत:चे व्यक्तिन्त्व प्राप्त होत असते. प्रत्येकाचे व्यक्तिमन्त्व वेगवेगळे असते. त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातही वेगवेगळया प्रणाली आढळतात. त्यालाच 'वाद' असे म्हणतात.

**'गांधीवाद' म्हणजे काय?**

१९ व्या शतकातील श्रेष्ठ व्यक्तिंपैकी महात्मा गांधी हे एक श्रेष्ठ व्यक्ती होते. ते जेव्हा आफ्रिकेतून भारतात परत आले तेव्हा त्यांच्यावर गोपाळ कृष्ण गोखले यांच्या विचारांचा प्रभाव पडला. त्यांचे विचार 'हिंद

स्वराज्य' 'सत्याचे प्रयोग' या पुस्तकातून आणि त्यांनी लिहिलेल्या पत्रातुन व भाषणांतून प्रकट झालेले आहेत. पुढे हिच विचारसरणी 'गांधीवाद' म्हणून प्रसिध्द झाली. गांधीवादाचा जन्म राष्ट्रीय चळवळीसाठी झाला. असे असले तरी इंग्रजांची सत्ता भारतातून नष्ट करण्याच्या हेतूने झाला नाही तर प्रत्येक मनुष्याने वाईट विचार सोडून स्वजाणिवा जागृत ठेवून स्वत:चा शोध घेणे हा गांधीवादी विचार होय. देशाच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणे म्हणजेच गांधीवाद होय. राष्ट्रवाद स्विकारणे म्हणजे गांधीवाद होय.

''गांधीजींविषयी मला फार आदर वाटतो. पण गांधीवादावर माझा विश्वास नाही. गांधीवाद हा तत्त्वज्ञानापेक्षा जीवनसाधनेचा एक मार्ग म्हणून मला अधिक महत्वाचा वाटतो. माणुसकीच्या सामाजिक मूल्यांवर तो आधारलेला आहे आणि त्याचे निष्कर्ष अमान्य असले तरी कुठल्याही जीवनक्षेत्रात या मुल्यांचे संरक्षण व्हावे'' यातून गांधीविषयीचा आदरभाव जरी व्यक्त होतांना दिसत असला तरी गांधीवादाविषयी नकाराचा भाव व्यक्त होतांना दिसतो. महाराष्ट्रातील अनेक विचारवंत महात्मा गांधीचे अनुयायी झालेत तरीही महाराष्ट्राचे जन-जीवन गांधीवादाने ढवळून निघाले नाही हे अगदी सत्य आहे.

**गांधीवादी मराठी साहित्य**

मराठी साहित्यामधील 'गावाकडे चला' असे सांगणारा नायक असलेल्या साहित्यकृतींनाच 'गांधीवादी' साहित्य म्हणण्याची प्रथा पडली आहे. हे साहित्य जीवनवादी आहे. ''गांधीवादी साहित्य म्हणजे राष्ट्रीय चळवळीला पूरक जाणिवा निर्माण करणारे, ध्येय्यवादाने भारुन गेलेले, उच्चविचार आणि साधी राहणी यांचा पुरस्कार करणारे, अहिंसा, करुणा, ह्दय परिवर्तन – प्रेम यांचा पुरस्कार करणारे, विशुध्द चारित्र्य आणि कृतिप्रवणता यांचा आग्रह धरणारे साहित्य हे गांधीवादी साहित्य म्हणून ओळखले गेले''[४] गांधीजींचे जीवनचरित्र, त्यांचे व्यक्तिमत्व, त्यांनी केलेली आंदोलने, साहित्ये आणि भाषणे याच्या प्रभावातून गांधीवादी मराठी साहित्य उदयास आले.

**मराठी कवितांवर गांधीवादाचा प्रभाव**

महात्मा गांधी हे स्वातंत्र्यासाठी झटणारे एक थोर महापुरुष होते. त्यांनी स्वातंत्र्यासाठी अनेक आंदोलने केली. त्यामुळे त्यांची थोरवी गाणारे व स्वातंत्र्य आंदोलनाचे महत्व सांगणारे अनेक कवी उदयास आले. कवी भा. रा. तांबे यांनी गांधीवादी विचारांच्या प्रभावातून कविता लिहिलेल्या आहेत. ते एक भावकवी व प्रेमकवी असुन सुध्दा 'रुद्रास आवाहन' ही कविता इंग्रजांना उद्देशून लिहिलेली आहे. इंग्रज सरकारने जालियनवाला बागेत नि:शस्त्र प्रजेवर क्रुर गोळीबारामुळे जे असंख्य लोक मृत्यूमुखी

पडले या घटलेला उद्देशून लिहिलेली ही कविता आहे.

'अब तुम जयजयकार करो' या हिंदीतील कवितेत भा. रा. तांबे यांनी महात्मा गांधी यांना 'मोहन' असे म्हटले आहे. 'कोण रोधिल' या कवितेत कवीने गांधी आणि त्यांच्या अनुयायांना राष्ट्रनिर्माति म्हटले आहे. 'प्रतिज्ञा' या कवितेमधून गांधीच्या जीवनावर प्रकाश टाकलेला आहे.

माधव ज्युलियन हे रविकीरण मंडळातील कवी होते. त्यांनी 'पश्चिमेच्या माऊतीचे उच्छवास' 'महात्मा गांधी आणि टागोर', 'महात्मा काय करील एकटा? इ. कविता गांधीजींच्या आदरापोटी लिहिल्या आहेत. विठ्ठलराव घाटे सुध्दा रविकीरण मंडळातील कवी होते. त्यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनावर 'तो पहा महात्मा आला' ही कविता लिहिली आहे. कवी यशवंत (यशवंत दिनकर पेंढारकर) यांनी 'अनुग्रह', 'शृंखलेस', 'अढळ 'सिंहासन', 'अन्य नको वरदान', 'सत्य न मरते दळभारे', 'महात्मन', 'देवालयाच्या आवारात', 'रक्ताचा अर्ध्य', 'द्या आम्हाला सुळी' ई. कवितांतून अहिंसेविषयी आपले मत व्यक्त केले आहे. जयकृष्ण केशव उपाध्ये यांनी आपल्या कविता महात्मा गांधी यांना उद्देशून लिहिल्या असल्या तरी काही कवितांतून म. गांधीची थट्टा केलेली दिसते. ''गांधीचे व्यक्तिमत्व, जीवनकार्य व विचार सरळसरळ पांढरपेशा मध्यमवर्गाच्या बौध्दिक सांस्कृतिक पायालाच सुरुंग लावणारा होता. दैनंदिन ऐटिक जीवनव्यवहाराच्या पातळीवरही आधुनिक प्रागतिक साहेबी मध्यमवर्गीयपण टाकून देण्याची गरज गांधी सांगत होते. त्यासाठी एक कार्यक्रमच त्यांनी देशासमोर ठेवला होता.''[५] भारताची खरी ओळख गांधी होय. गांधी एक विचार आहे. कुणी कितीही थट्टा केली तरी विचार कधीही मृत होणार नाही. हे तेवढेच सत्य आहे.

भ. श्री. पंडित यांनी महात्मा गांधीवर लिहिलेली 'अमर महात्मा' ही कविता उल्लेखनीय आहे. कवी कुसुमाग्रज हे साम्यवादी कवी होते. तरीही त्यांच्या कवितेत गांधीवादी ध्येय्यवाद आणि जीवननिष्ठा व्यक्त होतांना दिसतात 'करा दूर धरा हात', 'एक मागणे', 'खादी गीता', 'धृतराष्ट्रास', 'नेता' ई. कवितांमधून गांधीवादी जीवनदर्शन बघायला मिळते. साने गुरुजी हे पूर्णत: गांधीवादी होते. त्यांच्यावर गांधीवादाचा प्रभाव होता. त्यांनी 'पत्री' हा काव्यसंग्रह लिहिला. बा. भ. बोरकर यांची गांधीवादाचा उल्लेख असलेली 'जोतीचा जयजयकार', ही कविता आणि 'महात्मायन' हे संकलित दीर्घमहाकाव्य यातून त्यांच्यावर असलेला गांधीवादाचा प्रभाव लक्षात येतो. यांसह राजा मंगळवेडेकर, बाबा आमटे, पु. शि. रेगे, वसंत गुर्जर, रा. ग. जाधव यांच्याही कवितांवर गांधी वादाचा प्रभाव प्रकर्षाने जागवतो.

**गांधीवादाचा मराठी कादंबरीवरील प्रभाव**

कादंबरी हा वाड्.मयप्रकार वाचकांच्या मनाचा वेध घेणारा आहे. गांधीवाद ज्याप्रमाणे मराठी कवितेत दिसू लागला त्याचप्रमाणे मराठी कादंबरीवरही त्याचा प्रभाव पडला. वि. स. खांडेकर हे ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कादंबरीकार होते. त्यांच्या 'दोन धृव', 'उल्का', आणि 'कौंचवध' हया कादंबऱ्या गांधीवादाने भारलेल्या आहेत. वा. म. जोशी यांच्या 'इंदू काळे व सरला भाळे' आणि 'सुशीलेचा देव' हया सामाजिक कादंबऱ्या असल्या तरी त्यांत गांधीवादी बुध्दिप्रामाण्यवाद दिसून येतो. प्रेमा कंटक यांच्या 'काम आणि कामिनी' आणि 'अग्नियान' हया कादंबऱ्यांवर गांधीवादाची बैठक असल्याचे दिसते.

साने गुरुजी हे गांधीवादाचे खंदे पुरस्कर्ते होते. त्यांच्या 'क्रांती', 'संध्या', 'रामाचा शेला', 'धडपडणारी मुले' आणि 'श्यामची आई' या कादंबऱ्यांवर गांधीवादाची छाप पडलेली आहे. ''साने गुरुजींसारखा एखादा दुसरा साहित्यिक गांधीवादी दिशेने मन:पूर्वक वाटचाल करु पाहात होता. जनसामान्याकडून त्याला चांगला प्रतिसादही मिळत होता. परंतू गांधीवादाचा आवाका समर्थपणे पेलून धरण्यास लागणारे प्रतिभाबळ सानेगुरुजींजवळ नसल्यामुळे मध्यवर्ती साहित्यधारेवर साने गुरुजींचा प्रभाव पडू शकला नाही''[६] महात्मा गांधीची आस्तिकता, आदर्शवाद, सेवाभाव, त्याग, निष्ठा, बुध्दीवादावरील शंका, मनुष्याबद्दल प्रेमभाव हे विशेष साने गुरुजींच्या कादंबरीत आढळत असले तरी त्यांच्या कादंबऱ्या मात्र वाचकांच्या हृदयसिंहासनावर अधिराज्य गाजवू शकल्या नाही.

**मराठी नाटयसृष्टीवर गांधीवादाचा प्रभाव**

मराठी नाटयसृष्टीत मामा वरेरकर हे सुप्रसिध्द नाटककार होते. त्यांनी 'सत्तेचे गुलाम', 'धावता धोटा', 'तुरुंगाच्या दारात' हया नाटकातून सामाजिक, राजकीय परिवर्तनाची भूमिका मांडली आहे. ''सत्तेचे गुलाम' (१९२२) हे नाटक जन्माला आले. व्यावसायिक दृष्टया ते यशस्वीही ठरले; पण त्यातून होणारे गांधीवादाचे दर्शन फारच पृष्ठस्पर्शी आहे. कथानकाची रंगत वाढविणारा एक नवा पोशाखी मसाला, असे त्याला एकंदरीने स्वरुप प्राप्त झाले आहे.''[७] गांधीपूर्वकाळात ज्याप्रमाणे गांधीविचाराने प्रेरित नाटकांची निर्मिती झाली त्यामानाने गांधीयुगात मामा वरेरकर वगळता इतर नाटककारांवर म. गांधीचा प्रभाव झाल्याचे दिसून येत नाही.

**चरित्र, प्रबंध व वैचारिक निबंधावर गांधीवादाचा प्रभाव**

महात्मा गांधी यांनी 'हरिजन' आणि 'यंग इंडिया' साप्ताहिकातून आपली राजकीय, सामाजिक आणि अर्थविषयक मते मांडली. त्यामूळे विविध क्षेत्रात त्यांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. दादा धर्माधिकारी हे गांधीवादी विचारांचे जाणिवंत पुरस्कर्ते होते.

त्यांनी आपल्या साहित्यातून गांधीवादाचा पुरस्कार केला. आचार्य जावडेकर यांनी 'लोकमान्य टिळक व गांधी' या पुस्तकातून दोघांच्याही जीवनाची तुलना केली आहे. श्री. प्रभाकर दिवान यांनी लेखांतून गांधीजींचे विचार मांडले. आचार्य विनोबा भावे यांनी गांधी तत्त्वज्ञान सोप्या शब्दामध्ये मांडले. ते म. गांधीचे शिष्य होते. ग. बा. सरदार, नलिनी पंडित, नरहर कुरुंदकर, चंद्रशेखर धर्माधिकारी, वसंत पळशीकर, य. दि. फडके, भा. ल. भोळे, सु. श्री. पांढरीपांडे, यदुनाथ थत्ते, रामदास भटकळ, गणेशदेवी, सुरेश व्दादशीवार, अभय बंग, विश्वास पाटील, चंद्रकांत वानखेडे, चैत्रा रेडकर यांनी गांधीवादी वैचारिक निबंधाचा वारसा पुढे चालविला.

गांधीवाद समजून घ्यायचा असेल तर महात्मा गांधी यांचे व्यक्तिमत्व, त्यांचे कार्य, चळवळी समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. "परिस्थिताचे आव्हान स्विकारुन महानायक जन्माला येत असतात. गांधी हा असा महानायक होता. पण या महानायकाच्या अस्तित्वाचे आव्हान मराठी साहित्याला कसे पेलेल हा खरा प्रश्न आहे. आणि या प्रश्नाचे उत्तर नकारात्मक आहे. हे खेदाने म्हणावे लागते. विशेषत: मराठी कथा – कादंबरीसारखे प्रकार नुकतेच बहरु लागले होते. तेव्हा महाराष्ट्रातील प्रतिभावंतांचा गांधीप्रति प्रतिसाद कोता होता ही वस्तुस्थिती आहे"[८]

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात गांधीवाद अतिशय कृतिशील होता. या काळात मराठी साहित्याने गांधीवादाचा पूर्णपणे स्विकार न करता त्याची हेटाळणी केली. याच काळात मराठी साहित्यात गांधीवादाची पाळे-मुळे रुजायला हवी होती. तत्कालीन साहित्यिक हे मध्यमवर्गीय होते. ते आपल्याच सुखात तल्लीन असल्यामुळे गांधीवाद मराठी साहित्यात अपयशी ठरला. म्हणूनच स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही मराठी साहित्यात गांधीवादाविषयी नकारात्मकता दिसून येते.

**निष्कर्ष :**

१) महात्मा गांधीचे व्यक्तिमत्व, त्यांनी केलेली आंदोलने, त्यांचे साहित्य आणि भाषणे यांच्या प्रभावातून मराठीत गांधीवादी साहित्याचा उदय झाला.

२) सकारात्मक जीवनदृष्टी म्हणजे वाद तर स्वजाणिवा जागृत ठेवून स्वत:चा शोध घेणे व वाईट विचारांना मुठमाती देणे म्हणजे गांधीवाद होय.

३) विविध विचारसरणीच्या कवींवर गांधीवादाचा प्रभाव जाणवतो.

४)कादंबरीकारांमध्ये काही गांधीवादाचे खंदे पुरस्कर्ते होते. तर काहींना गांदीवादाचा आवाका पेलता आला नाही.

५) मराठी नाटयसृष्टीत मामा वरेरकर वगळता गांधीवादाचा प्रभाव इतरांवर पडलेला दिसून येत नाही.

६) गांधीवादी चरित्र, निबंध आणि वैचारिक निबंधाचा वारसा अनेक लेखक पुढे चालवित आहेत.

७) स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक साहित्यिक आपल्याच सुखात तल्लीन झाल्यामुळे मराठी साहित्यात गांधीवाद आपले पाय रोवण्यास अपयशी ठरला.

**संदर्भ :–**

तुषार गांधी, 'ओह माय गोडसे' (कांदबरी), लेखक श्री. विनायक होगाडे, विश्वकर्मा प्रकाशन, पुणे, २०००, मलपृष्ठावरील अभिप्राय.

यशवंत मनोहर, 'आंबेडकरवादी मराठी साहित्य', भीमरत्न प्रकाशन, नागपूर, १९९९, पृ. १९.

वि. वा. शिरवाडकर, 'प्रतिसाद', लोकवाड्. मयगृह प्रकाशन, मुंबई, १९७६, पृ. १७३.

चैत्रा रेडकर, 'महात्मा गांधी आणि मराठी साहित्य', संपा. प्रमोद मुनघाटे, साहित्य अकादेमी प्रकाशन, नवी दिल्ली, २०२२, पृ. ५६.

वसंत पंळशीकर, 'गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य', संपा, दत्तात्रय पुंडे, प्रतिभा प्रकाशन, पुणे, १९९५, पृ. ७३

गो. म. कुलकर्णी, 'गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य', संपा. दत्तात्रय पुंडे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९५, बीजलेखातून.

तत्रैव, पृ. ३६.

प्रमोद मुनघाटे, 'महात्मा गांधी आणि मराठी साहित्य', साहित्य अकादेमी प्रकाशन, नवी दिल्ली, २०२२, प्रस्तावनेतून. पृ. ग्प.